**TRANSFER OF VEHICLE**

I **SMT. JAYANTI ANAND SATARKAR** wife of **LATE. ANAND SHAMBA SATARKAR R/o, H.NO. K 10, KALAJIR, QUERIM PONDA-GOA** would like to transfer the **(Suzuki Access, Bearing Reg. No. GA-05-K-9795, Suzuki Access, Bearing Reg. No. GA-05-H-6546 and Maruti Swift Car, Bearing Reg. No. GA-05-D-6367)** on my name. Any person having any claim or objection in this regards shall intimate to the **RTO, PONDA** within 15 days from the date of publication of the notice.

SD/- **JAYANTI ANAND SATARKAR**

**CHANGE OF NAME**

I **Farhat bi Khatib** flat no f-5 Koshi bldg Katem Baina Vasco da Gama Goa would like to correct my name from **Farhat bi Abdul Aga** to **Farhat bi Khatib** herein after in all my dealings and documents I will be known by my new name **Farhat bi Khatib.**

**PUBLIC NOTICE**

TO ALL PERSONS, let it be known that WE, (1) Mr. Aniceto Otoniel Olavo Carlos Pascoal Mergulhao, And (2) Mrs. Ema Belinda Santos Fernandes Alias Ema Belinda Mergulhao, House No. 265/2, Bondorim, Dramapur, Salcete, Goa,, the undersigned Principal's, do hereby REVOKE IN ITS ENTIRETY that Power of Attorney executed on 13th October 2023, under Registration number 7417/2023, before Zenia Fernandes, Notary, Reg. No. 274/14; at Salcete Taluka State of Goa; thereby appointed appointed and ordained our daughter and son in law namely (1) MRS. LOREN MERGULHAO, daughter of Mr. Aniceto Otoniel Olavo Carlos Pascoal Mergulhao, wife of Mr. Mario Benjamin Diniz, 57 of age, and (2) MR. MARIO BENJAMIN DINIZ, 61 of age, son of Guilherme Redemtor Diniz, both residents of House No. 3/B, Aquem-Baixo, Opp Woods Residency, Navelim Salcete Goa as our true and lawful Attorney -in-Fact. This revocation of Power of Attorney shall be conclusively for all purpose, from 11th April 2025. We, the above Principals for good cause do hereby revoke, cancel and make void the Power of Attorney therein given and contained, for all matters granted to such Attorney-in-fact. Nothing herein shall affect any actions taken by my Attorney-in-Fact prior to and after this notice for revocation of POA. Notice of this revocation of POA shall be binding on every person or entity to which a copy of this revocation of POA has been given. A copy of this revocation of POA shall be effective as an original of all purpose. This Revocation of POA may be served via personal delivery, mail, facsimile transmission or other electronic transmission, and shall be effective regardless in the manner in which same is received. The undersigned absolves from liability of any person who acts in accordance with this Revocation of Power of Attorney. Sd/-

Aniceto Otoniel Olavo Carlos Pascoal Mergulhao,
Ema Belinda Santos Fernandes Alias Ema Belinda Mergulhao,

**BEFORE THE JOINT MAMLATDAR IV OF BARDEZ TALUKA, MAPUSA, BARDEZ, GOA**

**Mutation Case No: 100337 Village: Penha de Franca**

1. Roopali Sunil Lotlikar, r/o Shankar Niwas, Near Karapurkar Residency, Porvorim, Bardez, Goa .....Applicant

V/s

1. Camanem alias Ratnem alias Rukmabai Vishnu Kamat 2. Sitabai Ramchandra Sinai Rataboli 3. Vishnu Manjunath Kamat 4. Ramchandra Annat S. Rataboli ....Opponents

**PUBLIC NOTICE**

To all Opponents / Legal Heirs / any other interested parties

Whereas the applicant Roopali Sunil Lotlikar, r/o Shankar Niwas, Near Karapurkar Residency, Porvorim, Bardez, Goa, has applied for mutation under Section 96 of L.R.C. 1968, to include her name in the occupant column, under Sy. No. 192/1-B of Village Penha de France, Taluka Bardez, as per Deed of Sale reg. No. BRZ-BK1-02952-2011, CD No. BRZD187 dated 16.06.2011 executed before Sub Registrar Bardez and Deed of Rectification reg No. BRZ-BK1-03602-2011, CD No. BRZD204 dated 25.07.2011 executed before Sub Registrar Bardez.

Whereas, the notices in Form no. X were sent to all the interested parties by registered Ad. However some A.D. cards returned back with postal remark party expired / party left / not known / address out of station" and he do not know the detailed addresses of the legal heirs and whereabouts of the interested parties.

And whereas, the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.

Mapusa, Dated: 23/05/2025

Sd/- **Meghana Naik** Seal
Joint Mamlatdar V of Bardez
H/C of Joint Mamlatdar IV of Bardez
Mapusa, Goa

**BEFORE THE JOINT MAMLATDAR III OF BARDEZ TALUKA, MAPUSA, BARDEZ, GOA**

**Mutation Case No: 214481 City: Mapusa**

1. Mathias Pinho, C/o Cipriano F. Barretto, St. Anthony Apts, Mapusa, Bardez, Goa .....Applicant

V/s

1. Antonio Renato De Melo Mendonca alias Renato Melo Mendonca 2. Josephina Theresa Camila Fernandes 3. Maria De Lourdes Terezinha Filomena Melu E Mendonca 4. Armando Reinaldo de melo e mendonca 5. Allexandre Romualdo de Melo e Mendonca ....Opponents

**PUBLIC NOTICE**

To all Opponents / Legal Heirs / any other interested parties

Whereas the applicant Mathias Pinho, C/o Cipriano F Barretto, St Anthony Apts Mapusa Bardez, Goa, has filed the application U/S 96 of Goa Land Revenue Code 1968 for Mutation in property bearing chalta no. 26-D P.T. Sheet no 37 situated at Mapusa City Taluka Bardez Goa. Applicant has acquired the right over the property by virtue of Deed of sale under registration no 1894 Book no I Volume No. 333 dated 18/10/1995 duly registered in the office of the Civil Registrar cum Sub Registrar Bardez Goa. applicant has also submitted on record will dated 20/12/1967 and Testamento Publico dated 20/12/1969. Therefore applicant requested to include the name of Mathias Pinho in Form D of above mentioned chalta no. and P.T. Sheet no.

Whereas, the notices in Form no. X were sent to all the interested parties by registered Ad. However some A.D. cards returned back with postal remark party expired / party left / not known / address out of station" and he do not know the detailed addresses of the legal heirs and whereabouts of the interested parties.

And whereas, the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.

Mapusa, Dated: 21/05/2025

Sd/- **Jenisa Pereira** Seal
Joint Mamlatdar III of Bardez, Mapusa, Goa

# काणकोण भागात सहा इमारती धोकादायक स्थितीत

## जीवीत व वित्तहानी होण्याची शक्यता | इमारतींवर कारवाई करण्याची मागणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*





**आगोंद, दि. २६ :** काणकोण चावडी प्रभागात एकूण ६ इमारती धोकादायक असून यामधील ३ इमारती अत्यंत धोकादायक स्थितीत आहेत. त्या यंदाच्या पावसाळ्यात कधीही कोसळण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे जीवीत व वित्तहानी होण्याची शक्यता आहे. याप्रकरणी तातडीने व गांभीर्याने कारवाई आवश्यक असल्याची मागणी स्थानिक रहिवाशांकडून करण्यात आली आहे.

चावडी प्रभागातील या इमारती धोकादायक असून त्यावर कारवाई करण्याची मागणी गेल्या सहा–सात वर्षांपासून केली जात आहे. स्थानिक नगर पालिका, उपजिल्हाधिकारी कार्यालय, आपत्कालीन व्यवस्था विभाग यांच्या कार्यालयाना येथील एका इमारती संदर्भात निवेदन देण्यात आले होते. पालिका मंडळाच्या बैठकीत यावर चर्चा करून फार्मागुढी येथील तांत्रिक तज्ञांकडून निरिक्षण करून अहवाल सुद्धा मागविण्यात आला, मात्र अजून या इमारतीवर काहीच कारवाई होत नाही. या इमारतीचा काही भाग गेल्या पावसाळ्यात पहाटेच्या वेळी कोसळला व सुदैवाने कोणतीही मोठी हानी झाली नाही. दिवसा ही घटना घडली असती तर मोठे नुकसान झाले असते. असे शंकर नाईक म्हणाले.

ही इमारत कोसळली तर पुढच्या बाजूने मुख्य रस्ता असून पादचारी तसेच वाहतूक व्यवस्थेला धोका असून मागच्या बाजूला आपले घर जमीनदोस्त होण्याचा धोका आहे.त्यामुळे कागदी सोपस्कारासाठी वेगवेगळ्या कार्यालयात फिरणा–या फाइल्स वर योग्य तो तोडगा काढून संबंधित यंत्रणेने या इमारतीवर कारवाई करावी. अशी मागणी असे स्थानिक शंकर नाईक यांनी म्हटले आहे.

पावसाळ्यात गोवा मुक्ती नंतर लगेच उभारण्यात आलेल्या त्या इमारती आज जीर्ण अवस्थेत आहेत. या इमारतीची अनेक कारणांमुळे दुरुस्ती किंवा डागडुजी योग्य वेळी करण्यात संबंधित कमी पडले. ही परिस्थिती गोव्यात सर्वच शहरांत प्रामुख्याने आहे. या धोकादायक इमारती पाडण्यासाठी बरेच जण आग्रह धरतात, मात्र ठोस अशी कारवाई करण्यास प्रशासन धजावत नाही. याकरता दूरदृष्टीने विचार करून सरकारने पावले उचलावीत अशा प्रतिक्रिया याठिकाणी व्यक्त केल्या जात आहेत.

पान १ वरून

### मंत्री गावडेंवर कारवाई करणार : मुख्यमंत्री

भाजपचे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनीही गावडे यांच्या विधानांवर तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले की, भाजप हा शिस्तबद्ध पक्ष आहे. प्रत्येकवेळी मनात आले ते बोलणे खपवून घेतले जाणार नाही. केवळ इशारा नव्हे, तर लवकरच योग्य ती शिस्तभंग कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. एकंदरीत मंत्री गावडे यांच्यावर कारवाई करण्याकरीता आता पक्षांतर्गतच दबाव वाढत असून गावडे यांचे मंत्रीपद काढून घेतले जाण्याची पहिली शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा कहर

रत्नागिरी जिल्ह्यात मंगळवारपर्यंत हवामान विभागाने 'रेड अलर्ट' जारी केला आहे. जिल्ह्यातील अनेक भागांत पावसाने जोरदार हजेरी लावली असून, खेड–दापोली परिसरात मुख्य रस्त्यावरील वाहतूक ठप्प झाली आहे. फुरूस भागात सुरु असलेल्या पुलाच्या कामामुळे पाणी रस्त्यावरून वाहत आहे, त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.
हवामान विभागाच्या माहितीनुसार, २५ मे रोजी महाराष्ट्राच्या काही भागांत, संपूर्ण गोवा आणि कर्नाटकमध्ये मान्सून दाखल झाला आहे. पुढील तीन दिवसांत मान्सून महाराष्ट्रात पुढे सरकण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात पुढील पाच दिवसांत पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विशेषतः कोकण आणि मध्य महाराष्ट्राला लागून असलेल्या डोंगररांगांमध्ये जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

### ट्विन टॉवर्स प्रकल्पावरून काँग्रेसची सरकारवर जोरदार टीका

काँग्रेसने मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना आवाहन केले आहे की त्यांनी अशा प्रकल्पांवर सार्वजनिक निधी खर्च करण्याऐवजी कुड्डाळीमधील नागरिकांच्या प्राथमिक गरजांकडे लक्ष द्यावे. नागरिकांना आकर्षक टॉवर्स नको आहेत; त्यांना नियमित वीज, पुरेसा पाणीपुरवठा, सुरक्षित रस्ते आणि स्वच्छतेची हमी हवी आहे. सरकारने आपले प्राधान्यक्रम तातडीने बदलले पाहिजेत,अशी ठाम भूमिका सिमोस यांनी मांडली.

# मोरजी टेंबवाडा शापोरा, समुद्रकिनाऱ्यावरील कचरा हटविण्याची मागणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**पेडणे, दि. २६ :** मोरजी पंचायत क्षेत्रातील टेंबवाडा शापोरा व अरबी समुद्रकिनारी भागात मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याचे चित्र दिसून येत आहे.

या किनारी भागात पर्यटनाचे ३६५ दिवसही देशी विदेशी पर्यटक अधून मधून फेरफटका मारत असल्याचे चित्र दिसते. परंतु सध्या मोठ्या प्रमाणात शापोरा नदीकिनारी आणि समुद्रकिनारी कचरा साचल्याचे चित्र दिसत असून किनारा अस्वच्छ दिसतो. यावर सरकारने त्वरित उपाययोजना करून कचरा साफसफाई करण्याची पाऊले उचलावीत. अशी मागणी केली जात आहे.

नुकत्याच झालेल्या मोरची ग्रामसभेमध्ये या कचऱ्याविषयी ग्रामसभेमध्ये गरमागरम चर्चा झाली होती. पर्यटन हंगाम सुरू होण्यापूर्वी किनारी भागातील केरकचरा साफसफाई करण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत. अशी मागणी या ग्रामसभेत झाली होती. आणि त्यावेळी स्थानिक सरपंच पवन मोरजे यांनी आपण सरकारला निवेदन सादर करून तशा प्रकारची मागणी करणार असल्याचेही सांगितले होते. जर पर्यटन खाते समुद्रकिनाऱ्यावरचा केरकचरा उचलण्यास दिरंगाई करत असेल, तर केरकचरा उचलण्याची आमची तयारी असेल, असे उत्तर यावेळी सरपंच पवन मोरजे यांनी मोरजी ग्रामसभेत दिले होते. तशा प्रकारचे अधिकार सरकारने मोरजी पंचायतीला बहाल केले तर किनाऱ्यावरचा ही केरकचरा साफसफाई करण्याची जबाबदारी आम्ही घेऊ शकतो, असे ते म्हणाले होते.

# कुडणे येथे रंगला 'स्वर साधना' कार्यक्रम



कुडणे : 'स्वर साधना' कार्यक्रमात गायन सादर करताना गायक कलाकार.

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. २६ :** कुडणे येथे देव कुडणेश्वर मंदिरात प्रतिष्ठापना वर्धापनदिनानिमित्त सादर करण्यात आलेला 'स्वर साधना' कार्यक्रम रंगला.

कार्यक्रमाची सुरुवात नमन नटवरा विस्मयकारा या नांदीने करण्यात आली.त्यानंतर सौ.भार्गवी भास्कर मराठे हिने तुज मागतो मी आता हे भक्तीगीत सादर केले. त्यानंतर तिने हरी म्हणा कोणी गोविंद म्हणा व निघालो घेउनी दत्ताची पालखी ही गाणी सादर केली.कु.स्वतेजा कुंभार हिने आम्हा नकळे ज्ञान, सोहम हर डमरू बाजे, जय शारदे वाघेश्वरी,हरी भजनाविण काळ घालवू नको रे ही गाणी सादर केली.

कु.संयुक्ता देसाई हिने कबीराचे विणतो शेले कौसलेचा राम,मर्मबंधातली ठेव ही तसेच कोटी कोटी रूपे तुझी कोटी सूर्य चंद्र तारे ही गीते सादर केली. साक्षी आपटे हिने वेढा वेढा रे पंढरी हा अभंग सादर केला. नंतर गवळण व हे सुरांनो चंद्र व्हा हे नाट्यगीत सादर केले.शेवटी स्वतेजा कुंभार हिने जगत जननी भवतारिणी मोहिनी तू नवदुर्गा या भैरवीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.संवादिनीसाथ कुष्ठा मळीक व तबला साथ विश्वजित मळीक यांनी केली.आदिती मळीक हिने कार्यक्रमाचे निवेदन केले.

# दत्ताराम ठाकूर यांच्या गौरविकेचे प्रकाशन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. २६ :** दत्ताराम ठाकूर यांनी स्वकत्वातून ओळख निर्माण केली, अशा कर्तृत्ववान माणसांची समाजाला आज गरज आहे, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर यांनी केले. ते हरमल येथील नाट्यकलाकार दत्ताराम ठाकूर गौरविकेचे प्रकाशन करताना ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर मान्य मतदार संघाचे खास निमंत्रित माजी आमदार दयानंद सोपटे, ज्येष्ठ पत्रकार किशोर नाईक गावकर, कोरगाव येथील श्री कमलेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य सुदन बर्वे, सुप्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक शेखर खांडेपारकर, विठोबा बगळी, दत्ताराम ठाकूर, दीक्षा ठाकूर, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते दत्ताराम ठाकूर यांच्या जीवनावरील गौरविकेचे विमोचन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य पार्सेकर पुढे म्हणाले, दत्ताराम ठाकूर हे एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व आहे त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. शेती बागायती याबरोबरच उत्कृष्ट नाट्य कलाकार म्हणूनही ते नावारूपाला आलेले आहेत त्यांचा आदर्श, इतरांनी घ्यायला हवा असे सांगितले. माजी आमदार दयानंद सोपटे यांनी दत्ताराम ठाकूर यांच्या कार्याचा गौरव केला ते म्हणाले दत्ताराम ठाकूर यांनी अनेक माणसे जोडली गावा गावातून शहराकडे जाऊन सुद्धा मातीशी असलेली आपली नाळ त्यांनी तोडली नाही. आपल्या तिनही मुलांना त्यांनी उच्च शिक्षण दिले एक उत्कृष्ट समाजसेवक म्हणूनही त्यांनी नावलौकिक मिळवला. यावेळी किशोर नाईक गावकर यांनी दत्ताराम ठाकूर यांच्या बद्दल गौरवोद्गार काढले ते म्हणाले ते म्हणाल की, समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत राहिलेले ठाकूर हे गावासाठी भूषण आहे त्यांनी भले संपत्ती कमावली नसली तरी माणसे जोडलेली आहे. माणूस जोडणारा एक अवलिया म्हणून त्यांच्याकडे पाहता येईल. यावेळी माजी प्राचार्य सदन बर्वे यांनी आपल्या भाषणात दत्ताराम ठाकूर यांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले.

**CHANGE OF NAME**

I **AMANDA SALVACAO VAILANKAN DA COSTA** RES OF HNO 415 SANGAOOL VADDO MAJORDA SALCETE GOA WOULD LIKE TO CHANGE MY NAME FROM **AMANDA SALVACAO VAILANKAN D COSTA** TO **AMANDA SALVACAO VAILANKAN DA COSTA** HERE IN ALL MY DEALINGS AND DOCUMENTS I WILL BE KNOWN AS **AMANDA SALVACAO VAILANKAN DA COSTA.**

**Transfer of Vehicle**

I Prakash Gajanan Sawant, R/o H. No. 419, Kel Vada, Pirna, Bardez, Goa, wish to transfer the TATA tipper truck bearing registration No. GA 03 T 0808 & permit in my name which was registered in the name of my late father Gajanan Rajaram Sawant.

Any person is/are having any objection to the said transfer of vehicle / permit, should submit the same to The Directorate Transport, Mapusa, within 15 days of publication of the notice.

Sd/- Prakash Gajanan Sawant

**BEFORE THE JOINT MAMLATDAR IV OF BARDEZ TALUKA, MAPUSA, BARDEZ, GOA**

**Mutation Case No: 100335 Village: Penha de Franca**

1. Arvind Kashinath Lotlikar, r/o Shankar Niwas, Near Karapurkar Residency, Porvorim, Bardez, Goa .....Applicant

V/s

1. Camanem alias Ratnem alias Rukmabai Vishnu Kamat 2. Sitabai Ramchandra Sinai Rataboli 3. Vishnu Manjunath Kamat 4. Ramchandra Annat S. Rataboli ....Opponents

**PUBLIC NOTICE**

To all Opponents / Legal Heirs / any other interested parties

Whereas the applicant Arvind Kashinath Lotlikar, r/o Shankar Niwas, Near Karapurkar Residency, Porvorim, Bardez, Goa, has applied for mutation under Section 96 of L.R.C. 1968, to include his name in the occupant column, under Sy. No. 192/1-B of Village Penha de France, Taluka Bardez, as per Deed of Sale reg. No. BRZ-BK1-02953-2011, CD No. BRZD188 dated 16.06.2011 executed before Sub Registrar Bardez and Deed of Rectification reg No. BRZ-BK1-03778-2011, CD No. BRZD208 dated 04.08.2011 executed before Sub Registrar Bardez.

Whereas, the notices in Form no. X were sent to all the interested parties by registered Ad. However some A.D. cards returned back with postal remark party expired / party left / not known / address out of station" and he do not know the detailed addresses of the legal heirs and whereabouts of the interested parties.

And whereas, the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.

Mapusa, Dated: 23/05/2025

Sd/- **Meghana Naik** Seal
Joint Mamlatdar V of Bardez
H/C of Joint Mamlatdar IV of Bardez
Mapusa, Goa

# झेफीर होल्डींग डीटीसीवर उद्या खंडित वीजपुरवठा

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**पणजी, दि. २६ :** ४०० केव्हीए झेफीर होल्डींग डीटीसीवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २८ मे २०२५ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत जॉनवाडो, झेफीर होल्डींग आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

# रावण सत्तरी येथे उद्या स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. २६ :** वीर सावरकर युवा मंच,डिचोलीतर्फे श्री सातेरी केळबाय घाडवंश देवस्थान,रावण सत्तरी यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि.२ ८ रोजी रावण येथील देवस्थानात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती उत्साहात साजरी करण्यात येणार आहे, अशी माहिती रावण सत्तरी येथे घेतलेल्या पत्रकार परिषेदेत देण्यात आली.

यानिमित्त संध्या.६.३० वा.स्वरा क्रिएशन प्रस्तूत व शैलेश शिरोडकर निर्मित स्वातंत्रवीर सावरकर यांच्या निवडक गाण्यांवर आधारित मराठी संगीताचा कार्यक्रम 'सागरा प्राण तळमळला' सादर करण्यात येणार असून यात स्वरा शिरोडकर, प्राची



रावण : सावरकर जयंती कार्यक्रमाची माहिती देताना रामकृष्ण दळवी. सोबत काशिनाथ गावस, आपा गावस, आत्माराम गावस व सुदन हींदे.

आत्माराम गावस, सौम्या शिरोडकर व विजय शिरोडकर गायन करणार आहेत. त्यांना हार्मोनियमवर शैलेश शिरोडकर, तबल्यावर दिगंबर वेळगेकर, टाळ साथ चंद्रकांत शिरोडकर करणार आहेत.

त्यानंतर संध्याकाळी ७ वाजता सन्मान सोहळा होणार असून यात सामाजिक कार्यकर्त्या तसेच लेखिका नमन सावंत व गोमंतक गौसेवक महासंघ गोशाळा सिकेरीचे अध्यक्ष कमलाकांत तारी यांचा सन्मान होणार आहे.कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून हिंदू जनजागृती समिती गोवा राज्य समन्वयक सत्यविजय नाईक उपस्थित राहणार आहेत.अधिक माहितीसाठी ९२६०६६९७६२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

कार्यक्रम श्री सातेरी केळबाय घाडवंश देवस्थान, रावण सत्तरी येथे होणार आहे, अशी माहिती रावण येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत वीर सावरकर युवा मंचाचे अध्यक्ष रामकृष्ण दळवी यांनी दिली. यावेळी देवस्थानचे खजिनदार काशिनाथ गावस, सचिव आपा गावस, मंचाचे कार्यकर्ते आत्माराम गावस व सुदन हींदे उपस्थित होते. सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून मोठ्या संख्येने उपस्थिती लावावी, असे आवाहन वीर सावरकर युवा मंच,डिचोली आणि श्री सातेरी केळबाय घाडवंश देवस्थान, रावण सत्तरीतर्फे करण्यात आले आहे.

# अवकाळी पावसामुळे पेडणेत शेतीचे नुकसान

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**पेडणे, दि. २६ :** मान्सून पूर्व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्याचप्रमाणे पुढच्या पावसाळ्याच्या शेतामध्ये शेती करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये थोडी खुशी निर्माण झाल्याचे हे चित्र दिसून येते.

हेरवी पाऊस जून महिन्यात पडत असतो. जून महिन्यात पाऊस पडल्यानंतर शेतकऱ्यांच्या शेतजमनी घट्ट असतात. त्यामुळे नांगरणी करताना अडचणी येत असतात. आता मान्सूनपूर्व पावसाने मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्यामुळे शेती मऊ झालेली आहे. त्यामुळे जून महिन्यात शेती नांगरताना कसल्याच प्रकारच्या अडचणी येणार नाही. त्यामुळे काही शेतकरी खुशी व्यक्त करतात.

दरम्यान वायगण शेती यंदा उशिरा पिकल्यामुळे काहींनी ती कापून नंतर मळणी करण्यासाठी ठेवली होती. त्या शेतकऱ्यांना मात्र मोठ्या प्रमाणात नुकसान सोसावे लागले.

कोरगाव येथील प्रगतशील शेतकरी उदय प्रभुदेसाई यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की यंदा अवकाळी मान्सूनपूर्व मोठ्या प्रमाणात पाऊस लागल्यामुळे त्याचा फायदा शेतकऱ्यांना जे पावसाळी शेती करणार त्यांना होणार आहे. शेती नांगरताना यंदा शेती शेताचे मळे माती मऊ झाल्यामुळे नांगरताना सहज सोपे होणार आहे. परंतु काही शेतकऱ्यांना नुकसानी सोसावे लागणार, ऊस लागवड करताना विलंब झाला. मनुष्यबळ मिळत नसल्याने उसाचे मळे वेळेवर उगवता आले नाही. त्यामुळे त्यांनाही नुकसानी होणार. शिवाय काही जणांचे आंबे काजू ही पिके होती. त्यांना नुकसानी सोसावी लागेल. असे मत यावेळी उदय प्रभुदेसाई यांनी व्यक्त करून शेतकऱ्यांसाठी राज्य सरकार केंद्र सरकार वेगवेगळ्या योजना राबवत असतात. परंतु शेतकऱ्यांसाठी अनेक योजना आयुर्विमा एलआयसी असते त्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा लाभ पीक म्हणा शेती उगवताना होणारे नासाडी त्याची नुकसान भरपाई आयुर्विमामुळे नुकसान भरपाई मिळू शकते. त्यासाठी अशा योजनांची अंमलबजावणी राज्यात शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करून करायला हवी. त्याचाही लाभ शेतकऱ्यांना होऊ शकतो. असे मत यावेळी उदय प्रभुदेसाई यांनी व्यक्त केले.

पेडणे कृषी अधिकारी धीरज परब यांनी या अवकाळी पावसामुळे ज्या शेतकऱ्यांची वायंगण शेती उशिराने पिकलेली होती. त्यांना मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. काही शेतकऱ्यांचे झाडाला आंबे आहेत, सतत पडत असलेल्या पावसामुळे त्या आंब्याला कीड लागते. त्यामुळे शेतकऱ्यांना त्याची नुकसानी होऊ शकते, असे मत यावेळी कृषी अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. तांबोसे येथ शेतकऱ्यांचे नुकसान अवकाळी पावसाने तांबोसे पेडणे येथील शेतकरी पांडुरंग आसोलकर, दिलीप सामंत, रवींद्र गवंडी, दयानंद गवंडी, हरीश पाटील , इतर शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे.